# प्रेस नोट

**दक्षिण परिमंडळ ०३ अधिनस्त वडाळा पोलीस ठाणे हद्दीतून अपनयन झालेल्या २ अल्पवयीन मुलींचा २ तासात शोध घेऊन सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात दिले बाबत**

दक्षिण परिमंडळ ०३, मुंबई अधिनस्त वडाळा पोलीस ठाणेस दिनांक ११/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांनी त्यांच्या १) १२ वर्ष व २) ०५ वर्षे वयाच्या ०२ अल्पवयीन मुलींचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपनयन केले बाबत रात्री २०:१५ वाजे दरम्यान तक्रार दिल्याने गु.र.नं २४७/२०२६ कलम १३७(२) बी.एन.एस. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाची माहिती मिळताच मा.पोलीस उप आयुक्त,दक्षिण परिमंडळ ०३,मुंबई श्री विजयकांत सागर यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस आयुक्त,वडाळा विभाग, श्री विश्वनाथ कोळेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वडाळा पोलीस ठाणे, श्री सुदर्शन होनवडजकर यांनी वडाळा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायाने तांत्रिक मदत व स्थानिक माहिती प्राप्त करून नमुद दोन्ही मुलींना मरीन ड्राईव्ह चौपाटी येथुन केवळ ०२ तासात स्थानिक मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणेच्या मदतीने ताब्यात घेतले व सदर दोन्ही मुलींना सुरक्षितपणे त्यांच्या कायदेशीर पालकांच्या ताब्यात दिले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. श्री देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, (का. व सु) बृहन्मुंबई, मा. श्री शैलेश बलकवडे, अपर पोलीस आयुक्त,दक्षिण प्रादेशिक विभाग मुंबई, मा. पोलीस उपायुक्त, दक्षिण परिमंडळ ३, मुंबई श्री विजयकांत सागर सो, मा. सहायक पोलीस आयुक्त वडाळा विभाग श्री विश्वनाथ कोळेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुदर्शन होनवडजकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री प्रसाद वागरे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री विनोद कालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री दिपक गुरव ,पो.ह. क्र. ०८०७२५/अंकुश खुणे, पो.ह.क्र. ०६०४०४/संदिप दहिफळे, व म.पो.शि.क्र. ११२७८५/ जोला धर्मा वसावे, पो.शि.०९०५४८/समीर धुमाळ (तांत्रिक मदत) यांनी पार पाडली आहे.